# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
ईमेल/ Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


परिपत्रक क्र.३०७/२०२५

विषय: पीएच्.डी. संबंधित मा. कुलगुरू यांचे आदेश क्र. १९५/२०२५ दिनांक २३ जुलै, २०२५ मधील ३ (b) मध्ये नमूद राष्ट्रीय स्तरावरील फेलोशीप प्राप्त विद्यार्थ्यांच्या व ६ (६.२) नुसार आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या पीएच्.डी.प्रवेशाबाबत.

विद्यापीठाकडून पीएच्.डी. प्रवेश प्रक्रिया वेळोवळी राबविण्यात येऊन पात्र विद्यार्थ्यांना पीएच्.डी. प्रवेश देण्यात येतात. परंतु राष्ट्रीय स्तरावरील फेलोशीप प्राप्त विद्यार्थ्यांना पीएच्.डी. प्रवेश घेण्याबाबत काही अवधी देण्यात येतो, त्या अवधीतच पीएच्.डी. प्रवेश घेणे अनिवार्य असते. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची परीक्षा आंतरराष्ट्रीय केंद्र, प्रस्तुत विद्यापीठाकडून आयोजित करून पात्र विद्यार्थ्यांना पत्र दिले जाते, त्यांची पुढील कार्यवाही शैक्षणिक प्रवेश विभागाकडून करण्यात येते.

**राष्ट्रीय स्तरावरील फेलोशीप प्राप्त विद्यार्थ्यांच्या पीएच्.डी. प्रवेश प्रक्रियेबाबत..**

पीएच्.डी. संबंधित मा. कुलगुरू यांचे आदेश क्र. १९५/२०२५ दिनांक २३ जुलै, २०२५ मधील ३ (b) (i) मध्ये नमूद राष्ट्रीय स्तरावरील फेलोशीप प्राप्त विद्यार्थी वर्षभरात कधीही संशोधन केंद्रात जाऊन पीएच्.डी. प्रवेश घेण्याकरिता अर्ज करून शकतो. संबंधित संशोधन केंद्र त्यांच्रेकडील संशोधन मार्गदर्शकाकडे संबंधित प्रवर्गासाठीची रिक्त जागा उपलब्ध असल्यास प्रवेशाबाबत पुढील कार्यवाही करेल. तथापि, ही सर्व प्रक्रिया पार पाडताना संशोधन केंद्राना विविध स्तरावर अडचणी निर्माण होत असल्याचे विद्यापीठाच्या निदर्शनास आले असून त्यामुळे ही सर्व प्रक्रिया खालीलप्रमाणे पीएच्.डी. ट्रॅकींग प्रणालीद्वारे ऑनलाईन विहीत केली आहे.

१. फेलोशीप प्राप्त विद्यार्थ्याने संशोधन केंद्रात पीएच्.डी. प्रवेशाकरिता विनंती केल्यास संबंधित संशोधन केंद्राने त्यांच्या लॉगीनमधून संबंधित विद्यार्थ्याची माहिती भरून आवश्यक कागदपत्रे तपासून अपलोड करावेत. सदर अर्ज व फेलोशीप घोषणा पत्र मान्यतेसाठी शैक्षणिक प्रवेश विभागाच्या लॉगीनमध्ये प्राप्त होईल. संशोधन केंद्रांनी विद्यार्थ्याची शैक्षणिक पात्रतेसंदर्भात सर्व कागदपत्रे तपासून संबंधित विद्यार्थी पीएच्.डी. प्रवेशास पात्र असल्याची खातरजमा केल्याशिवाय ऑनलाईन प्रणालीत अर्ज करू नये.

२. शैक्षणिक प्रवेश विभागाकडून फेलोशीप घोषणा पत्र तपासून त्यास मान्यता प्रदान करण्यात येईल. मान्यता प्रदान केल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यास पीएच्.डी. प्रवेश प्रक्रिया अर्जाचे शुल्क भरण्याकरिता लिंक त्याच्या ईमेलवर पाठविण्यात येईल.

३. संबंधित विद्यार्थ्याने प्राप्त लिंकवर क्लिक करून शुल्क भरावे. सदर शुल्क भरल्यानंतर संबंधित संशोधन केंद्रास विद्यार्थी प्रवेशास पात्र आहे, याची खात्री होईल.

४. संबंधित संशोधन केंद्राच्या लॉगीनममध्ये विभागीय संशोधन समितीकरिता मा. कुलगुरू यांचे नामनिर्देशित प्रतिनिधींची नावे उपलब्ध असल्यास त्यामध्ये दोन विषयतज्ज्ञ समाविष्ट करून समितीची रचना करावी व विद्यार्थ्याची मुलाखत आयोजित करावी. जर लॉगीनमध्ये मा. कुलगुरू यांचे नामनिर्देशित प्रतिनिधींची नावे उपलब्ध नसल्यास मा. कुलगुरू यांचे नामनिर्देशित प्रतिनिधींची नावे मिळण्यासाठी संशोधन केंद्राच्या लॉगीनमधून Request Generate करावी.

५. संबंधित संशोधन केंद्रानी मुलाखत प्रक्रिया पार पडल्यानंतर समिती सदस्यांनी गुणदान केल्यानंतर संबंधित संशोधन केंद्राच्या लॉगीनमध्ये एकत्रित गुणांचा अहवाल (Consolidated Report) व निवड अहवाल (Selection Report) डाऊनलोड करून सर्व समिती सदस्यांच्या सह्यासह दोन्ही अहवाल पीएच्.डी. ट्रॅकींग प्रणालीवर संशोधन केंद्राच्या लॉगीनमधून अपलोड करावेत. तद्नंतर शैक्षणिक प्रवेश विभागाकडून सदर अहवालाची छाननी करून त्यास मान्यता प्रदान करण्यात येईल.

६. पुढील विषय मान्यतेची प्रक्रिया इतर विद्यार्थ्यांप्रमाणे पीएच्.डी. ट्रॅकींग प्रणालीमधून करावी.

*सदरील पीएच्.डी. प्रवेश हे अंतिम फेलोशीप अॅवार्ड झाल्यास त्यांना लागू होईल. तथापि, विद्यार्थ्यांची फेलोशीप नामंजूर (reject) झाल्यास संबंधित विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द करण्यात येईल, याची संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.*

**आंतरराष्ट्रीय स्तरावरील विद्यार्थ्यांच्या पीएच्.डी. प्रवेश प्रक्रियेबाबत..**

आंतरराष्ट्रीय केंद्र, प्रस्तुत विद्यापीठ यांचेकडून पीएच्.डी. प्रवेशाकरिता पात्र विद्यार्थ्यांची यादी संबंधित संशोधन केंद्राना दिल्यानंतर संबंधित संशोधन केंद्र मुलाखतींचे आयोजन करून मुलाखत अहवाल मान्यतेसाठी शैक्षणिक प्रवेश विभागाकडे पाठविला जातो. सद्यस्थितीत ही सर्व प्रक्रिया ऑफलाईन पद्धतीने पार पडत असल्याने संबंधितांना अडचणी निर्माण होत आहे, त्यामुळे पीएच्.डी. संबंधित मा. कुलगुरू यांचे आदेश क्र. १९५/२०२५ दिनांक २३ जुलै, २०२५ मधील ६ (६.२) नुसार आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या पीएच्.डी. प्रवेशाबाबत ही सर्व प्रक्रिया खालीलप्रमाणे पीएच्.डी. ट्रॅकींग प्रणालीद्वारे ऑनलाईन विहीत केली आहे.

१. आंतरराष्ट्रीय केंद्र, प्रस्तुत विद्यापीठ यांनी आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी पीएच्.डी. प्रवेश प्रक्रिया आयोजित करून पात्र विद्यार्थ्यांची यादी संबंधित संशोधन केंद्राला दिल्यानंतर संबंधित संशोधन केंद्राने त्या विद्यार्थ्यांची माहिती पीएच्.डी. ट्रॅकींग प्रणालीवर भरणे. त्यानंतर शैक्षणिक प्रवेश विभागाकडून पीएच्.डी. प्रवेश परीक्षेचा निकाल व इतर आवश्यक संबंधित कागदपत्रे तपासून मान्यता प्रदान करण्यात येईल.

२. विभागीय संशोधन समितीमध्ये संबंधित संशोधन केंद्राचे प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख हे अध्यक्ष, दोन विषय तज्ज्ञ (एक अंतर्गत व एक बाह्य) अशी समितीची पीएच्.डी. ट्रॅकींग प्रणालीत रचना करावी. पात्र विद्यार्थ्यांची समितीसमोर मुलाखत झाल्यानंतर समिती सदस्यांनी त्यांनी त्यांच्या लॉगीनमधून गुणदान करावे

३. समिती सदस्यांनी गुणदान केल्यानंतर संबंधित संशोधन केंद्राच्या लॉगीनमध्ये एकत्रित गुणांचा अहवाल (Consolidated Report) व निवड अहवाल (Selection Report) डाऊनलोड करून सर्व समिती सदस्यांच्या सह्यासह दोन्ही अहवाल पीएच्.डी. ट्रॅकींग प्रणालीवर संशोधन केंद्राच्या लॉगीनमधून अपलोड करावेत.

४. प्राप्त अहवालाची छाननी करून त्यास संबंधितांची मान्यता घेऊन शैक्षणिक प्रवेश विभागाकडून मान्यता प्रदान करण्यात येईल.

५. पुढील विषय मान्यतेची प्रक्रिया इतर विद्यार्थ्यांप्रमाणे पीएच्.डी. ट्रॅकींग प्रणालीमधून करावी.

सदरील प्रक्रिया सुलभ होण्यासाठी वरील प्रक्रियेचे सर्व संबंधितांना User Manual लॉगीनमध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

गणेशखिंड, पुणे )
संदर्भ : शै. प्रवेश/3222 )
दिनांक : 02/12/2025 )

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

प्रत:

१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. प्राचार्य/संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/संशोधन केंद्र, प्रस्तुत विद्यापीठ

आपणांस विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील/संशोधन केंद्रातील सर्व संशोधन मार्गदर्शकांच्या निदर्शनास आणून उपरोक्त दिलेल्या सूचनेनुसार कार्यवाही करण्यायाबाबत अवगत करावे.

D:\General Circulars\Ph.D. Admission.docx